आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १४९ वा ● रविवार दि. १० नोव्हेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### जगप्रसिद्ध सारंगी वादक पंडित राम नारायण यांचं निधन; शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

मुंबई : आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या सारंगी वादनानं लाखो रसिकांना मंत्रमुग्ध करणारे पद्मविभूषण पंडित राम नारायण यांचं शुक्रवारी (८ नोव्हेंबर) रात्री मुंबईत निधन झालं. वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राम नारायण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्यांच्या निधनानं संगीत क्षेत्रातील एका महान कलाकारास आपण मुकलो आहोत, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. मूळचे राजस्थानच्या उदयपूरमधील राम नारायण हे ५० च्या दशकात मुंबईत आले आणि एकल सारंगी वादक म्हणून त्यांनी मोठी लोकप्रियता मिळवली. त्यांनी सारंगी वादनाच्या विविध शैली विकसित करून जागतिक स्तरावर कीर्ती मिळवली. संगीत क्षेत्रातील नवनव्या कलाकारांना पंडित राम नारायण यांचं कार्य नेहमीच प्रेरणा देणारं ठरेल, असं मत मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केलं आहे.

## झरोका

एक - विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने मीच उमेदवार असलो तरी आजवर मतदार संघाचा विकास मीच केला आहे. आणि यापुढे ही मीच करणार आहे. अशी बतावणी सर्वच पक्षाचे उमेदवार करीत असल्यामूळे यातील काय गौडबंगाल काय आहे ते कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा - अरे, वास्तविक पाहाता आजचे उमेदवार जे आहेत, हे राजकीय पक्षाचे दावणीतले घोडे आहेत. विकास म्हणजे काय, त्यांना माहीत नाही, कारण गेल्या पाच वर्षा मध्ये सत्तास्पर्धेच्या नादाखाली कोणत्याही लोकप्रतिनिधीने काम केलेले नाही. जे कांही झाले ते प्रशासकीय यंत्रणेतून झालेले आहे. त्या बद्दल तू कोणावर विश्वास ठेवू नकोस, गप्प बसं.

एक - अहो, असे कसे काय म्हणता. उदगीरच्या आमदाराने कोट्यावधीचा निधी आणला. औसा, निलंगा, उदगीर लातूरसह त्या त्या आमदारानी कोट्यावधी रुपयाचा खर्च केला, असे ते सांगतात. मग हा विकास नाही तर काय म्हणावे हे कळतच नाही. तूम्ही प्रशासनाला डोक्यावर कसे काय घेता.

दुसरा - अरे, लोक निधी हा, प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या नावाने आलेलाच असतो. परंतू सत्ताकारणाच्या वादावादीत गट, तटा मुळे सारेच आमदार त्या त्या नेत्याच्या पाठी मागे असल्यामूळे प्रशासनानेच तो निधी त्या त्या मतदार संघात खर्च केला. त्याचा फायदा लोकप्रतिनिधी उधळत असतील तर त्यांचा दोष काय, तू शांत बसं.

एक - अहो, असे म्हणून चालणार नाही. समाज मंदीरे असतील, पाणंद रस्ते असतील, पाणी पूरवठा जावू द्या क्रिडा संकुले असतील किंवा संस्थाचालकाच्या शाळानां अनुदान असने ही खिरापत वाटने हे विकास म्हणावे काय, विकास हा सुशिक्षीत बेकाराना नौकरी देणे, कामगारांना काम देणे, गोरगरीबांना अन्न, वस्त्र, निवारा देणे, यालाच विकास म्हणतात. मग हे उमेदवार विकास आम्हीच केला आणि आम्हीच करणार आहोत, असे म्हणतात या बद्दल आश्चर्य वाटते, म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे, असं, तसं नसतं, राजकीय नेते, स्वतःसाठी अगडबगड बोलून बाजी मारुण जातात. परंतू वास्तव असे आहे की, कोट्यावधीच्या खर्चावर ही आजही कामगारानां काम मिळत नाही. उपासपोटी जगावे लागते आहे, ज्याच्या जिवावर अर्थकारण उभे राहाते तोच श्रमीक वर्ग उपासपोटी असेल तर भारताची अर्थिक प्रगती कशी होईल, आणि महाराष्ट्र हा बलवाण कसा होईल हे आजच्या राजकर्त्यांना कळत नाही का, मग तू कशाला असा, तसा विचार करतोस.

एक - अहो, तसे नाही, विधानसभा निवडणूका लागल्यामूळे महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार हे आम्हीच विकास केला, करणार आहोत, असे म्हणत आहेत, तर दुसरीकडे इतर उमेदवार आमच्याशिवाय पर्याय नाही, असे सांगूण मतदाराना झुलवित, भुलवीत आहेत, त्यामूळे डोकं वैतागल म्हणून बोलतो आहे.

## लातूर विधानसभा मतदार संघात चाकूरकरांची धास्ती, विजयाला नाही कोणालाही खात्री !

लातूर (दैलाप्रप्र) : लातूर विधानसभा मतदार संघात पूर्वी कॉंग्रेसचे वर्चस्व असले तरी, आजघडीला कॉंग्रेस, भाजपा बरोबरीने कार्यरत आहे. विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी तर्फे कॉंग्रेसचे माजी मंत्री अमित विलासराव देशमूख हे उमेदवार आहेत. तर प्रतिस्पर्धी म्हणून कॉंग्रेसचे एक निष्ठपणे हायात घातलेले माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सूनबाई डॉ. अर्चना शैलेश पाटील चाकूरकर या कॉंग्रेस उमेदवारा विरोधात भाजपाचे कमळ घेवून निवडणूक रिंगणात उभ्या आहेत. कारण लातूरच्या विकासामध्ये कॉंग्रेसच्या विलासराव देशमूख यांनी त्यांचे मामा डॉ. गोपाळराव पाटील यांना राज्यसभेवर भाजपाच्या कोट्यातून पाठवून भाजपाला वाट मोकळी केली. त्यामूळे विलासराव, गोपीनाथराव हे सख्खे जुळले.




त्यातूनच आजघडीला कॉंग्रेशी घराण्यातील अमित देशमूख विरुध्द अर्चना पाटील चाकूरकर हे कॉंग्रेस, भाजपाच्या टिकीटावर एकमेका समोर आमने, सामने उभे असल्यामूळे शिवराज पाटील चाकूरकर यांची धास्ती अन् त्यात विजयाची नाही कोणाला खात्री अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात व्यक्त होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता मधल्याकाळा मध्ये विलास देशमूख यांनी काट्याने काटा काढण्याचे राजकारण खेळून अंतर्गत चालीने लोकसभा निवडणूकीत चाकूरकरांचा पराभव घडवून आणला आणि यावरच न थांबता लातूर लोकसभा मतदार संघ हा, राखीव करुन टाकला. ती सल शिवराज पाटील चाकूरकर यांच्या मणात असणारच, त्यामूळे सुनबाई अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना भाजपा तर्फे निवडणूक का लढवतेस हा प्रश्न चाकूरकरांनी केला नसावा, कारण लोकशाही मध्ये प्रत्येकाला आपापला निर्णय घेण्याचा अधिकार असतो, हा संदर्भ चाकूरकरानां ज्ञात असल्यामूळे भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढविणाऱ्या अर्चना ताईनां शिवराज पाटील चाकूरकर यांनी शुभेच्छा दिल्या. परंतू मी कोणत्याही पक्षाचा प्रचार करणार नाही. हे स्पष्ट केल्यामूळे उद्याच्या विधानसभा निवडणूकीत काय घडेल, हे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या भुमिकेची धास्ती महाविकास आघाडीत विस्तारलेली असल्यामूळे विजयाची खात्री देता येत नाही, अशीच लोकभावना व्यक्त होत असून भाजपाच्या तिकीटावर अर्चना ताई पाटील चाकूरकर या विजयी म्हणून लातूरच्या विकासाला गती देतील काय अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

## कुटुंबावर व समाजावर झालेल्या खोट्या गुन्ह्यामुळे जगताप यांना पाठिंबा- नाईकनवरे

माजलगाव (प्रतिनिधी)आ.प्रकाश सोळंके यांनी या पाच वर्षात सुडाचं राजकारण केलं आहे. पुर्वी पंचवीस वर्षात कधी केलं नाही ते त्यांनी या पाच वर्षात केलं आहे.माझ्या कुटुंबीयातील सदस्यावर हे गुन्हे दाखल केले आहेत.मराठा संदर्भात आरक्षण प्रश्नावरही त्यांनी वादग्रस्त विधान करून समाजाचा रोष घेतला आहे.त्यामुळे मोहन जगताप यांना पाठिंबा देत आहे,असे नितीन नाईकनवरे यावेळी सांगितले.



यावेळी ते म्हणाले की,मतदार संघात आपल्या आमदार महोदयाची या पाच वर्षात एकाधिकारशाही वाढली आहे.सुडाचं राजकारण करून त्यांनी अनेकांना राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न केला आहे.आमच्या कुटुंबातील सदस्यांनाही त्यांच्या या राजकारणाचा परिणाम भोगावा लागला आहे. मराठा आरक्षण प्रश्ना संदर्भात त्यांचे वादग्रस्त विधान समाजाला न पचणारे आहे.त्यामुळे माझा मोहन जगताप यांना पाठिंबा आहे.त्याचबरोबर माझ्यासोबत असणारे सरपंच,चेअरमन,कार्यकर्ते यांनीही मोहन जगताप यांची पसंती माझ्याजवळ बोलून दाखवली.त्यामुळे मी मोहन जगताप यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.असेही ते यावेळी म्हणाले.

मोहन जगताप हे कार्यकर्ता,सांभाळणारे, त्याला ताकद देणारे एकमेव राजकीय नेते आहेत,असे नितीन नाईकनवरे यावेळी म्हणाले.

त्यामुळे जगताप परिवार हे सर्व समाजाला सन्मानपूर्वक वागणुक देणारं परिवार असल्याचे जगताप यांनी यावेळी स्पष्ट केले.

ावेळी माजी आ.बाजीराव जगताप,किसन नाईकनवरे,नारायण डक,दयानंद स्वामी, मिलिंद आव्हाड,कॉ.दत्ता डाके,गंगाभीषण थावरे,सहाल चाऊस,नारायण होके,कचरू खळगे,राहुल जगताप,दत्ता नाईकनवरे,कल्याण नाईकनवरे यांच्यासह पदाधिकारी सरपंच कार्यकर्ते नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात २५ नोव्हेंबरपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर, : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ११ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २५ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. .

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही.

कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पोहोचले प्रकाश आंबेडकरांच्या भेटीला, नेमकं कारण काय?

पुणे : विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतलीय. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांना लवकरात लवकर बरं होऊन जनसेवेत रुजू होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसंच ''इथं जवळच सभा होती आणि प्रकाश आंबेडकरांचं नुकतच ऑपरेशन झालं होतं म्हणून भेटायला आलो होतो. याचा कुठलाही राजकीय अर्थ काढू नका,'' असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केलं आहे. प्रकाश आंबेडकरांच्या भेटीनंतर मुख्यमंत्री शिंदेंची प्रतिक्रिया : यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ''प्रत्येक भेटीकडं राजकीय दृष्टीनं बघू नका. तसंच राजकीय अर्थ देखील काढू नका. प्रकाश आंबेडकर हे माझे चांगले मित्र असून त्यांची काही दिवसांपूर्वीच अँजीओप्लास्टी झाली. माझी बाजुलाच सभा असल्यामुळं मी त्यांना भेटलो आणि ही भेट आमची सदिच्छा भेट होती. यात राजकीय काहीही नव्हतं.'' उपमुख्यमंत्र्यांनीही घेतली भेट : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही नुकतीच प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना अजित पवार म्हणाले की, ''प्रकाश आंबेडकर यांची काही दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांच्या तब्येतीबाबत विचारपूस करण्यासाठी आलो होतो. आमच्या दोघांमध्ये जवळपास एक तास चांगल्या प्रकारे चर्चा झाली. प्रकाश आंबेडकर यांची तब्येत चांगली असून ते लवकरच राज्यात प्रचारासाठी बाहेर पडणार आहेत,'' असं अजित पवारांनी सांगितलं. प्रकाश आंबेडकर यांना ३१ ऑक्टोबर रोजी छातीत दुखू लागल्यानं पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यानंतर त्यांच्यावर अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी करण्यात आली. ती यशस्वी होऊन त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

## अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांच्या जाहीर सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

माजलगाव(प्रतिनिधी)दलित,वंचित, मुस्लिम,गोरगरीब मराठा,बहुजन यांचा बुलंद आवाज असणारे अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा रविवार दि.१० रोजी दुपारी १ वा. जुना मोंढा मैदान माजलगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.या एल्गार सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे वतीने करण्यात आले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते अ‍ॅड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या(जोशोबा महासंकल्प)जाहीर सभेस विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.माजलगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर हे वंचित बहुजन आघाडीकडून माजलगाव विधानसभेचे उमेदवार आहेत.पक्ष प्रवेश केल्यानंतर अल्पावधीत त्यांनी मतदारसंघात पक्षाचे विचार दलित,मुस्लिम,गोरगरीब मराठा, बहुजन समाजापर्यंत नेण्याचे काम केले आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत पक्षाचे वातावरण निर्माण केले आहे.दरम्यान मतदार संघात बहुरंगी लढत होत आहे.या लढतीत अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांच्या रविवार दि.१० रोजी होणाऱ्या जाहीर(जोशोबा महासंकल्प सभेने)वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.त्यामुळे या जाहीर सभेत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे वतीने करण्यात येत आहे.

## निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्रात २८० कोटींचे घबाड पकडल

मुंबई : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांची चुरस रंगात आली आहे. निवडणूक आयोगाच्या उड्डाण पथकानं आणि पोलिसांच्या पथकानं गेल्या दोन दिवसांत मुंबई महानगर प्रदेशातील विविध ठिकाणांहून ७.३ कोटी रुपये आणि प्रेशर कुकर असलेलं वाहन जप्त केल्याची माहिती मिळत आहे. एका अधिकाऱ्यानं दिलेल्या माहितीनुसार, प्रेशर कुकर असलेल्या वाहनाबाबत दुसऱ्या पक्षाकडून प्रचार सुरू असताना माहिती मिळाली होती. ते म्हणाले की, ऐरोली मतदारसंघातून अपक्ष उमेदवार असलेलं आणि प्रेशर कुकर 'निवडणूक चिन्हावर' निवडणूक लढवत असलेल्या विजय चौघुले यांचं पोस्टर वाहनाच्या पुढच्या सीटवर आढळून आलं आहे. विविध ठिकाणांहून जी रोख जमा करण्यात आली त्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांनी गुरुवारी रात्री दक्षिण मुंबईतील काळबादेवी येथे १२ जणांकडून २.३ कोटी रुपये रोख जप्त केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन जाण्याचं कारणही ते सांगू शकले नाहीत. दुसऱ्या जप्तीमध्ये मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांनी बुधवारी नाकाबंदीदरम्यान एका एटीएम व्हॅनची झडती घेतली.

## भाजपचे उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर खाडे यांची हत्या, कुऱ्हाडीने वार करून निर्घृण खून

सांगली : राज्यात सगळीकडे निवडणुकीचे वातावरण आहे. प्रत्यक्ष मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असल्यामुळे प्रचार शिगेला पोहोचला आहे. सांगली जिल्ह्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे मनसेचे माजी जिल्हाप्रमुख सुधाकर खाडेंची हत्या झाली आहे. या घटनेनंतर आता सांगलीत आता राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सध्या खाडे भाजपच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष होते. मिळालेल्या माहितीनुसार मिरज-पंढरपूर रस्त्यावर ही घटना घडली होती. प्राथमिक माहितीनुसार मालमत्तेच्या कारणातून ही हत्या झाली आहे. सध्या सुधाकर खाडे हे भाजपच्या स्टार्टअप इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष होते. २०1४ मध्ये त्यांनी तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली होती. मीरज-पंढरपूर रस्त्यावर सुधाकर खाडे यांच्यावर खुनी हल्ला झाला होता. या हल्ल्यात खाडे गंभीर जखमी झाले होते. हल्ल्यानंतर त्यांना उपचारासाठी तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. खाडे यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीला शिवसेनेतून सुरुवात केली होती.

## लातुरकरांचा संपर्क व संवाद कधीही तुटणार नाही - डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर याची ग्वाही

लातूर / प्रतिनिधी : मी लातूरची रहिवासी आहे.या भागातील समस्यांची मला जाण आहे. शहरातील समस्या सोडविण्याचा प्लॅन माझ्याकडे तयार असून एक लोकप्रतिनिधी म्हणून लातूरकरांचा आणि माझा संवाद व संपर्क कधीच तुटणार नाही.तुमच्या प्रत्येक सुख- दु:खात मी नेहमी सोबत असेन. प्रभागात मूलभूत सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे,अशी ग्वाही डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी दिली.



भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी प्रचारानिमित्त प्रभाग क्रमांक १८ मधील बसवेश्र्वर चौक व परिसरात शनिवारी (दि. ९) सकाळी पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला.यावेळी डॉ.चाकुरकर बोलत होत्या.यावेळी महिला व नागरिकांनी प्रभागातील समस्यांचा पाढाच ताईसमोर वाचला.

महात्मा बसवेश्र्वर महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व आशीर्वाद घेऊन पदयात्रेस प्रारंभ झाला.पदयात्रेदरम्यान विविध ठिकाणी प्रभागातील महिलांनी महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचे औक्षण करून निवडणुकीत विजयासाठी आशीर्वाद दिला. तब्बल तीन तास चाललेल्या या पदयात्रेचे प्रभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.नागरिक व महिला भगिनी त्यांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते.आपापल्या दारात पुष्पहार घालत शाल श्रीफळ देत नागरिकांनी ताईंना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.घरात यावे असा आग्रह अनेक भगिनी करत असल्याचे दिसून आले. कामाची वेळ असूनही महिला भगिनींची मोठी उपस्थिती हे या यात्रेचे वैशिष्ट्य होते.यावेळी नागरिकांनी आपल्या भागातील समस्या ताईंच्या कानावर घालत त्या सोडविण्यासाठी विद्यमान नेतृत्वाने प्रयत्न न केल्याचे सांगितले. लोकप्रतिनिधी अथवा उमेदवारही आमच्या भागाकडे येत नाहीत.या भागात येणाऱ्या आपण पहिल्याच लोकप्रतिनिधी असल्याच्या भावनाही नागरिकांनी यावेळी बोलताना व्यक्त केल्या.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानानिमित्त २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील आठवडी बाजार राहणार बंद

लातूर, : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा. तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी जिल्ह्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. या दिवशीचा आठवडी बाजार इतर दिवशी भरविण्यात येणार आहे. मार्केट ण्ड फेअर क्ट १८६२ चे कलम ५ मधील तरतुदीनुसार पणन संचालक यांनी दिलेल्या मान्यतेनुसार हे आदर्श निर्गमित करण्यात आले आहेत.

बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ लातूर तालुक्यातील मुरुड, टाकळी शी., औसा तालुक्यातील नागरसोगा, उजनी, रेणापूर तालुक्यातील खरोळा, निलंगा तालुक्यातील लांबोटा, कासार सिरसी, पानचिंचोली, हलगरा, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शिरूर अनंतपाळ, उदगीर तालुक्यातील वाढवणा बु., अहमदपूर तालुक्यातील किनगाव, चाकूर तालुक्यातील चापोली आणि देवणी तालुक्यातील देवणी बु. या ठिकाणी होणारे आठवडी बाजार २० नोव्हेंबर २०२४ ऐवजी इतर दिवशी भरविण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## काय बोलता राव ?

देश मे एक ही नाम, संविधान, संविधान ही बॅनर महाराष्ट्रात आहे की नाही, माहिती नाही. परंतू लातूरमधील महाविकास आघाडीचे उमेदवार अमित देशमूख यांच्या प्रचाराखातर ही बॅनर झळकते आहे, मग त्यांचा विजय पक्काच असेल, यात संदेह नसावा.

**काय बोलता राव !**

अरे, कशात ना काय, फाटक्यात पाय, हे कशाला बोलतो आहेस. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अमित देशमूख हे तत्कालीन मुख्यमंत्री, दिवंगत विलासराव देशमूख यांचे सुपूत्र आहेत. त्यांच्याच नांवावर त्यांनी आजवर सत्ताकारण केलेले आहे. गेल्या पाच वर्षा मध्ये अमित देशमूख यांनी कोणत्याही गल्ली बोळात फिरकले नाहीत, परंतू लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सुशोभीकरणासाठी निधी मंजूर झाला, शासनाने तो लातूर महानगरपालिकेकडे वर्ग केला त्यानंतर माजी खासदार सुधाकर शृंगारे यांच्या माध्यमातून खुर्चीस्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळा उभारण्यासाठी शासकीय निधी मंजूर झाला तोही लातूर महानगरपालकेकडे जमा झाला असे असताना ही स्थानीक आमदार म्हणून अमित देशमूख यांनी मनपा आयुक्त तथा प्रशासकाना अडवणूक करुन आंबेडकर पार्क सुशोभिकरण आणि पुतळा निर्मिती विषय गुंडाळून ठेवून आजघडीला स्वतःच्या विजयासाठी देश मे एक ही नाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान संविधान म्हणून मिरवित आहेत, त्याना कोण मतदान करणार, कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क हे आजघडीला खरेदी विक्रीचे बाजारपेठ बनल्याचे दिसते आहे.

कारण किरायाच्या लालसे पोठी लातूर मनपा मार्फत उद्याला आंबेडकर पार्क वर जनावराचा ही खरेदी विक्रीचा बाजार भरवू शकतील हे लोकप्रतिनिधी अमित देशमूख यांचे काम आहे काय यासाठी मनपाचे काय भुमिका असेल हे सांगणे कठीण दिसते, मग बोला दाजीबा !

# अपवादातील वाद कायमच !

## संपादकीय...

लोकशाहीच्या माध्यमातून भारतीय राजकारण आणि सत्ताकारण हे गुंतागुंतीचे झाल्याचे दिसते आहे. कारण असे की, प्रारंभीच्या काळा मध्ये स्वतंत्र भारताच्या राजकारणात कॉग्रेस आणि जनसंघ हाच पक्ष होता. स्वातंत्र पुर्व काळापासून भारतीय राजकारणात कॉग्रेस अग्रेसर होती. कॉग्रेस मुळेच भारताला स्वातंत्र मिळाले हा इतिहास कोणी ही नाकारु शकत नाही. त्याकाळी जनसंघ कार्यरत असला तरी तो नाममात्र होता. आजघडीला जनसंघा ऐवजी भाजपा, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, जनता दल, लोक दल, आणि बहुजन समाज पार्टी वगैरे वगैरे, अनेक राजकीय पक्षाची भरारी असली तरी, निवडणूकीच्या निमित्ताने प्रत्येक पक्षा मध्ये अंतर्गत अपवादातील वाद कायमच असल्याचे दिसते आहे.

मुळातला राजकीय पक्ष म्हणजे कॉग्रेस हा असला तरी आज या कॉग्रेस पक्षातील खिचडी सर्वपक्षीय विखुरलेली दिसते आहे. कॉग्रेस मधीलच नाराज होतकरु किंवा स्वार्थी लोक सर्व पक्षात विखुरले गेले आणि त्यानी आपापला सवतासुभा उभा केला. त्याचीच पिल्लावळ भाजपा, जनता दल, लोक दल, भाजपा वगैरे पक्षा मध्ये दिसते आहे. त्यात आंबेडकरी चळवळीच्या नावावर उभे राहिलेले रिपाइं पक्ष असोत, किंवा बसपा असेल, यातील सर्व लोक नेते मंडळी इतंराच्या कुबड्या घेवून राजकारणात कार्यरत असल्याचे दिसते आहे. त्याही पक्षा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव घेवून त्याच्यात ही अंतर्गत वादातील वाद स्पष्ट होताना दिसतो आहे. आजघडीला लोकसभा निवडणूकी नंतर विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने उपरोक्त सारे राजकीय पक्ष महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने एकमेका समोर दंड थोपटून उभे असल्याचे दिसते आहे. हे लोकशाहीचे लक्षण असले तरी आपवादातील वाद कायमच असल्याचे भिती बळावताना दिसते आहे.

विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या संस्कृतीक वैभवाला घोडेबाजाराचे स्वरुप आल्याचे दिसते आहे. कारण असे की, सर्वच राजकीय पक्षा मध्ये जुन्याला डावलून बाहेरच्यानां उमेदवारी देणे आणि लायकीचा सोडून नालायकाला जवळ करणे, हीच परिस्थिती सर्वच राजकीय पक्षातील निवडणूकीतील उमेदवाराच्या निवडीतून स्पष्ट होते. कारण निष्ठावंत कोण, स्वार्थी कोण, आणि विष्ठावंत कोण याची काळजी पक्ष श्रेष्ठी घेत नसल्यामुळे निवडणूकीतील रागरंग लोकशाही विरुध्द हुकूमशाहीचाच रंग दिसते की काय, अशी विसंगत कुजबूज राजकीय वर्तूळात होत असताना दिसते आहे. त्यामूळे निष्ठावंत कार्यकर्ते बंडखोरीच्या नावाखाली अधिकृत उमेदवाराच्या विरोधात दंड थोपटून निवडणूक लढवित असल्यामूळे या बंडा मागे त्या, त्या उमेदवाराच्या राजकीय पक्षाचा हात आहे की, स्वाभीमानाने कार्यकर्ते बंडात सामिल झाले, यातील गौडबंगाल काय असावे हे कळत नसले तरी निवडणूकीच्या निमित्ताने जो कांही विधानसभा निवडणूकीत लडतीलचा जो प्रकार सर्वपक्षीय क्षेत्रात होताना दिसतो आहे, त्यामुळे आपवादातील वादाला जबाबदार कोण असावे अशीच संशयात्मक प्रतिक्रिया प्रसार माध्यमातून प्रकट होताना दिसते आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने राजकीय सत्ताकारणासाठी प्रधान मंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि महायुतीचे वगैरे वगैरे नेत्यासह महाविकास आघाडीतील कॉग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहूल गांधी, प्रियंका गांधी, शरद पवार, उध्दव ठाकरे, वगैरे वगैरे डिन्नीचे कार्यकर्ते नेते, महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूकीच्या रणांगणात प्रचार प्रसारासाठी सज्ज आहेत, त्यांची रणधुमाळी चालू असताना प्रत्येक मतदार संघा मध्ये अधिकृत उमेदवाराच्या विरोधा मध्ये एकमेका समोर बंडखोरीच्या नावावर जे कोणी उमेदवार उभे आहेत, त्यासंदर्भात कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता, वास्तवाचे स्पष्टीकरण करु शकत नाही, त्यामूळे अपवादातील वादाला शंका घेण्यासाठी जागा शिल्लक राहाते अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमत्ताने जो कांही खिचडी बाजार चालू आहे, त्यामुळे मतदार हा सैरभैर झाला असून कोणत्या पक्षाचा कोणता उमेदवार खरा आहे, आणि त्यातील बंडखोराचे काय अशा संभ्रमात असून मतदारसंघ निहाय स्थानिक पातळी वरचे नेते हा अधिकृत आहे, तो अनाधिकृत आहे, पंरतू योग्यत्या उमेदवाराला मतदान करा अशी दाराआड कुजबूज करीत असल्यामूळे कोणत्या उमेदवाराला साथ द्यावी या संभ्रमात मतदार अटकलेला दिसतो आहे. त्यामूळे त्या त्या मतदार संघातील स्थानिक पातळीवर राजकीय चर्चेला बगल देवून प्रसार माध्यमे ही रोखठोक भुमिका स्पष्ट करीत नसल्यामूळे मतदार हा शंका कुशंकेत गुरफटलेला दिसतो आहे. त्यामूळे राजकीय पक्षातील सत्ता स्पर्धेच्या रणधुमाळीत विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने परस्पर विरोधी उमेदवारातील अपवादातील वाद कायमच राहातो, त्याचे निराकारण कोण करणार ही उद्याच्या मतदान दिनापूर्वी स्पष्टीकरण व्हावे ही काळाची गरज वाटते.

## मौंजे चिंचोलीरावावाडी व परिसरात स्वीप कक्षाच्या माध्यमातून जनजागृती



लातूर (जिमाक): जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली २३४– लातूर ग्रामीणचे निवडणूक निर्णय अधिकारी संदिप कुलकर्णी यांच्या नेतृत्वात मतदान जनजागृती (स्वीप)च्या पथकाने गावातील गृहभेटी देवून घरोघरी मतदार जागृतीस सुरुवात केली आहे. या अंतर्गत मतदारांना मतदान करण्यासाठी प्रात्साहीत करुन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

चिंचोलीरावावाडी मांजरा साखर कारखाना परीसरातील मतदार व तरुण – तरुणी नव–मतदार यांनी मतदानाच्या उत्साहात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. गावातील व स्थलांतरीत मतदारांना संपर्क करुन २० नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्या मतदान केंद्रावर येऊन मतदान करुन घेण्याचे यावेळी युवकांनी आश्र्वासित केले. या मतदान जनजागृतीमुळे मतदारामध्ये मतदान करण्यासाठी उत्साह निर्माण झाला आहे.

याप्रसंगी २३४ – लातूर ग्रामीण मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी डॉ. मारुती सलगर म्हणाले मतदारांना संविधानाने मतदानाचा आधिकार दिला आहे, त्या अधिकाराचा हक्क आपण बजावून राष्ट्र व लोकशाही मजबूत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ राज्याच्या सरासरी मतदानाच्या टक्केवारीपेक्षा आपल्या गावाची मतदानाची टक्केवारी होती. येत्या २० नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या विधानसभेच्या मतदानात मतदार यादीत समाविष्ट मतदारांनी मतदान करुन आपल्या गावातील सर्व मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पथकातील नोडल अधिकारी धनराज गीते, स्वीप समन्वयक मंगेश सुवर्णकार, स्वीप सदस्य हनुमंत भासिंगे, सुरेखा चंदिले, अमृतेश्र्वर स्वामी, जाकिर शेख, माधव बन यांनी आपल्या लोकगीत, गवळण, भारुड, पथनाट्याच्या माध्यमातून उपस्थित तरुण–तरुणी, जेष्ठ, दिव्यांग, तृतीयपंथी मतदारांना मतदानाचे आवाहन केले.

## जनसंपर्क अभियाना अंतर्गत महाविकास आघाडी कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांची प्रचारार्थ पदयात्रा, मतदारांचा उस्फुर्त प्रतिसाद

लातूर (प्रतिनीधी) : लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी जनसंपर्क अभियाना अंतर्गत शनिवारी सांयकाळी शहरातील प्रभाग १०, ११ व १२ येथे भव्य प्रचार रॅली काढली या रॅलीला शहरवाशीयांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुरुष महिला, युवक, युवती मोठया प्रमाणात या रॅलीत सहभागी झाले होते. ठिकठिकाणी नागरिकाकडून फटाक्याची आतषबाजी आणि पुष्पवृष्टी करण्यात आली.

सांयकाळी ६ वाजता लातूर शहराच्या ५ नंबर चौकातून लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचार रॅलीला प्रारंभ झाला. रॅलीच्या प्रारंभीच हजारोंच्या संख्येत तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या रॅलीची सुरुवात होताच कॉंग्रेस पक्षाच्या विजयाच्या घोषणांनी परीसर दुमदूमून गेला. रॅली मार्गावर अनेक ठिकाणी नागरिकांनी रांगोळी काढून मार्ग सुशोभित केला होता., अनेक

घरांच्या छतावरुन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली, हातात फलक, झेडे घेऊन मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक सहभागी झाले

## पुन्हा महायुती सरकार आल्यावर शेतक–यांना पूर्ण कर्जमाफी देणार – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



मुंबई : विदर्भाच्या विकासाचे काम अतिशय वेगाने महायुती सरकारने केले.आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्याला महायुती सरकारने विकासाच्या केंद्रस्थानी आणले आणि विदर्भात आतापर्यंत झालेल्या विकासकामांचे श्रेय हे केवळ महायुती सरकारचेच आहे. जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा महायुती सरकार आल्यावर शेतक–यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशिम येथील जाहीर सभेत केली. येत्या काळात वाशिम जिल्हा औद्योगिक विकासाचे केंद्र असेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. वाशिम जिल्ह्यातील कारंजा मतदार संघातील सई डहाके, वाशिमचे श्रयाम खोडे आणि रिसोडच्या उमेदवार भावना गवळी या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी घेण्यात आलेल्या या सभेला व्यासपीठावर महंत जितेंद्र महाराज, डॉ.रणजीत पाटील, माजी आमदार विजयराव जाधव, महंत अभी महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महायुती सरकारने या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात निधी देऊन अनेक कामे केली. त्याचे श्रेय सर्वस्वी महायुतीचेच आहे. वाशिम जिल्हा हा सातत्याने दुर्लक्षित असलेला जिल्हा होता.जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थीतीमुळे कनेक्टिव्हीटी नव्हती आणि त्यामुळे हवा तसा जिल्ह्याचा विकास होऊ शकला नाही.पण २०१४ साली भाजपा सरकार सत्तेवर आल्यावर आपण वाशिम जिल्ह्याला विकासाच्या केंद्रस्थानी आणले आणि आज समृद्धी महामार्गामुळे वाशिम जिल्ह्याची कनेक्टिव्हिटी वाढून हा मध्यवर्ती जिल्हा झाला आणि भविष्यात समृद्धी महामार्गामुळे या भागात मोठी औद्योगिक प्रगती होताना दिसेल.अनेक राष्ट्रीय महामार्गांनी या जिल्ह्याला जोडण्याचे काम आपण केले. रस्ते पूलांसाठी ९०० कोटी रुपये दिले. खामगाव जालना रेल्वे प्रकल्पाला मान्यता दिली आणि कोट्यवधींचा निधी देऊन या भागात रेल्वेचे जाळे तयार करण्याचे काम आपण केले. काबरा आणि सावरगाव माळ या दोन ठिकाणी दोन औद्योगिक विकास केंद्र तयार करत आहोत त्या माध्यमातून तरुणाईच्या हाताला काम मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी गडाकडे साठ – सत्तर वर्षात कुठल्याही सरकारने लक्ष दिले नव्हते.

२०१४ मध्ये सरकार आल्यावर आपण १०० कोटी रुपये दिले. त्यानंतर महायुती सरकारने आणखी ६०० कोटी रुपये विकासासाठी दिले. मला अभिमान आहे की बंजारा समाजाच्या इतिहासात इतक्या वर्षात पोहरागडावर भवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी कुठलेही पंतप्रधान आले नव्हते. मा.नरेंद्र मोदी हे पहिले असे पंतप्रधान आहेत की जे पोहरागडावर आले आणि सेवालाल महाराजांचे दर्शन त्यांनी घेतले, असेही देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

## ..तर पहिल्या १०० दिवसांत धिरज भैय्यांच्या सगळ्या मागण्या पूर्ण करु



लातूर / प्रतिनिधी : महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत धिरज भैय्यांच्या सगळ्या मागण्या पूर्ण केल्या जातील, असे आश्र्वासन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले. त्याचबरोबर त्यांनी आमदार धिरज देशमुख यांच्या भाषणाचेही कौतुक केले. धिरजभैय्यांना पहिल्यांदाच त्यांच्या मतदारसंघात ऐकले. एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेल्या भाषणाला माझा मानाचा मुजरा, अशा शब्दांत त्यांनी गौरव केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे कॉंग्रेस–महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रचारासाठी आयोजित महिला मेळाव्यात त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, आमदार धिरज विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख, रीड लातूरच्या संस्थापक अध्यक्षा दीपशिखा देशमुख, स्वयंप्रभा पाटील, सुनिता आरळीकर, आशा भिसे, शिला पाटील, दैवशाला राजमाने यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

त्या पुढे म्हणाल्या, महाराष्ट्राची संस्कृती पुरोगामी विचाराची आहे. परंतु भाजपने महाराष्ट्रातील पक्ष फोडले, घर फोडले. आमचा पक्ष गेला, चिन्ह गेले, नेते गेले, महामंडळे गेली, सगळे गेले. परंतु जनता आमच्यासोबत राहिली आणि लोकसभेत महाविकास आघाडीचे खासदार जनतेने निवडून दिले. या सरकारने फक्त घरे फोडली नाहीत तर येथील उद्योग इतर राज्यात पळवून नेले. आमच्या बेरोजगारांच्या ताटातला घास हिसकावण्याचे पाप यांनी केले असल्याची जहरी टीका त्यांनी केली.

कॉंग्रेस पक्षाने देशाला इंदिरा गांधींसारख्या पंतप्रधान दिल्या. राजकारणात महिलांसाठी सोनिया गांधी यांनी ५० टक्के आरक्षण दिले. लातूर कॉंग्रेसने सुद्धा आरक्षण नसताना महिलांना जिल्हा परिषद अध्यक्ष पद, महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर, कारखान्याच्या चेअरमन, बँकेत संचालक म्हणून संधी दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

विलासरावांना अभिमान वाटला असता

खासदार सुप्रियाताई सुळे यांनी आदरणीय विलासराव देशमुखसाहेबांची आठवण काढून त्यांना अभिवादन केले. या मातीने खूप मोठा सुपुत्र महाराष्ट्र दिला आहे. आदरणीय वैशालीताई यांची त्यांना साथ होती. आदरणीय साहेबांचे विचार, त्यांचा आदर्श, समर्थ वारसा त्यांचे तीन सुपुत्र या ठिकाणी चालवत आहेत. धिरजभैय्यांचे अप्रतिम भाषण ते एक आदर्श लोकप्रतिनिधी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. त्यांनी ज्या–ज्या मागण्या केल्या आहेत. त्या सगळ्या मागण्या मी वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. आपल्या सरकारचा शपथविधी झाल्यावर पहिल्या १०० दिवसांत सगळ्या मागण्या पूर्ण करणार आणि त्याची अंमलबजावणी करणार असल्याचा शब्द त्यांनी दिला.

हे लाडकं नव्हे लबाड सरकार– धिरज देशमुख

भाजपने अदृश्य शक्तीच्या माध्यमातून महायुतीचे सरकार जनतेवर लादले आहे. परंतु आमच्यावर आई तुळजाभवानी व महालक्ष्मीचा आशीर्वाद आहे. महाविकास आघाडीचे सरकार या ठिकाणी निवडून येणार आहे, असा विश्र्वास आमदार धिरज देशमुख यांनी व्यक्त करत कॉंग्रेसने काय केले असा प्रश्र्न विरोधक विचारतात. परंतु, दहा वर्षांमध्ये राज्य सरकारने व केंद्र सरकारने काय केले हे सांगा असा जाब त्यांनी विचारला. महायुती सरकारने फक्त भ्रष्टाचार, बेरोजगारी, महिला अत्याचार यात महाराष्ट्र एक नंबरवर नेऊन ठेवला आहे. हे लाडकं नाही तर लबाड सरकार आहे, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

दिल्लीप्रमाणे ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा व्हाव्यात, आरोग्य व्यवस्था प्राथमिक आरोग्य केंद्र, बचत गटाला शून्य टक्के व्याज, ग्रामपंचायतीमध्ये महिलांना उद्योगासाठी जागा उपलब्ध करणे तसेच बचत गटांना शासनाच्या विविध वस्तू निर्मितीमध्ये सहभाग वाढविणे, गावामध्येच केजी टू पीजी शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रयत्न करण्याची विनंती केली.

भाजपमुळे विकृत मानसिकता वाढली– प्रणिती शिंदे

खासदार प्रणिती शिंदे यांनी भाजपा युती सरकारवर जोरदार हल्ला चढवला. जिजाऊ, सावित्रींचा, अहिल्याबाईंचा महाराष्ट्र जो पुरोगामी विचारधारेवर चालतो, त्या महाराष्ट्रामध्ये आज चार–चार वर्षाच्या लहान मुलींवर अत्याचार आणि अन्याय होत आहेत. एकीकडे लाडकी बहीण म्हणून महिलांना तीन हजार रुपयांची लाच देत आहेत. तर दुसरीकडे त्याच लाडक्या बहिणीच्या चिमुरडीवर अन्याय, अत्याचार होतात. ही विकृत मानसिकता भाजपमुळे वाढली आहे. भाजप यासाठी दोषी असल्याचा आरोप करत भाजपला आता मते मागण्याचा अधिकार नसल्याचा घणाघात प्रणिती शिंदे यांनी यावेळी केला.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना

शिंदे पुढे म्हणाल्या, भाजपने निवडणुकीच्या तोंडावरच ही लाडकी बहीण चालू कशी केली. मागच्या तीन वर्षात लाडक्या बहिणाचा का विसर पडला होता? असा सवाल केला. ते आधी टेबलाच्या खालून पैसे द्यायचे आता टेबलाच्या वरून पैसे देत असल्याची टीका प्रणिती शिंदे यांनी केली.

## इतिहासात आजचा दिवस १० नोव्हेंबर २०२४

अंतरराष्ट्रीय

१८८२ – गॉटलिब डेमलरने तयार केलेली पहिली मोटरसायकल चालवून दाखविण्यात आली.

१९६८ – चंद्राला प्रदक्षिणा घालून पृथ्वीवर परतलेल्या 'झोंड–६' या यानाचे रशियाकडून प्रक्षेपण .

राष्ट्रीय

१६५९ – शिवाजीमहाराजांना पकडून आणण्याचा विडा उचलणाऱ्या अफझल खानचा मोठ्या युक्तीने महाराजांनी वध केला.

१६९८ – कलकत्ता बंदर स्थानिक राजाकडून ईस्ट इंडिया कंपनीने विकत घेतले.

१९५८ – बडोद्याजवळ वेदसार येथे प्रायोगिक विहिरीत तेल सापडले.

२००६ – गेल इंडिया लिमिटेडने आपल्या हाजिरा–विजयपूर–जगदीशपूर पाईपलाईन प्रकल्पासाठी तेल उद्योग सुरक्षा संचालनालयाचा पुरस्कार पटकावला.

२००८ – भारताने १९८३ नंतर प्रथमच ऑस्ट्रलियाचा दारूण पराभव करत कसोटी मालिकेत २००५ नंतर पहिल्यांदा ऑस्ट्रेलियाला पराभवाचा धक्का दिला आणि 'बोर्डर–गावस्कर' ट्रॉफी टीम इंडियाने खिशात टाकली.

२००८ – भारतीय क्रिकेट संघाचा यशस्वी माजी कर्णधार सौरव गांगुली उर्फ 'दादा'ने आपल्या कसोटी क्रिकेट कारकिर्दीला रामराम ठोकला.

जन्म

७४५ – मुसा अल–कझीम, शिया इमाम.

१४८३ – मार्टिन ल्युथर, जर्मन धर्मसुधारक.

१६८३ – जॉर्ज दुसरा, ईंग्लंडचा राजा.

१८४५ – सर जॉन स्पॅरो डेव्हिड थॉम्पसन, कॅनडाचा चौथा पंतप्रधान.

१८४८ – सुरेंद्रनाथ बॅनर्जी, भारतीय कॉंग्रेसचे एक प्रसिद्ध नेते.

१८७१ – विन्स्टन चर्चिल, इंग्लिश लेखक.

१८८८ – आंद्रेइ तुपोलेव्ह, रशियन विमान अभियंता.

१८९५ – जॉन क्नुडसेन नॉर्थ्रोप, अमेरिकन विमान अभियंता.

१९१८ – मार्टिन हेनली, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.

१९१९ – मिखाइल तिमोफीविच कलाश्निकोव्ह, रशियन संशोधक.

१९१९ – मॉइझे त्शोम्बे, कॉंगोचा पंतप्रधान.

१९३३ – सेमूर नर्स, वेस्टइंडीझचा क्रिकेट खेळाडू.

१९४२ – रॉय फ्रेडरिक्स, वेस्टइंडीझचा क्रिकेट खेळाडू.

१९७२ – नईम अशरफ, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.

१९७३ – झहीद फझल, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.

१९७८ – मफिझुर रहमान, बांगलादेशचा क्रिकेट खेळाडू.

१९८५ – आफताब अहमद, बांगलादेशचा क्रिकेट खेळाडू.

निधन

१४४४ – व्लादिस्लॉस तिसरा, पोलंडचा राजा.

१४८९ – राजा तोडरमल, अकबराच्या नवरत्न दरबारापैकी एक रत्न.

१५४९ – पोप पॉल तिसरा.

१६७३ – मिकाल विस्नियोवियेकी, पोलंडचा राजा.

१९३८ – मुस्तफा कमाल अतातुर्क, तुर्कस्तानचा संस्थापक व राष्ट्राध्यक्ष.

१९६८ – तुकडोजीमहाराज, आधुनिक महाराष्ट्रातील थोर संत कवी.

१९८२ – लिओनिद ब्रेझनेव्ह, सोवियेत संघाचा राष्ट्राध्यक्ष.

१९९५ – केन सारो–विवा, नायजेरियाचा लेखक.

१९९६ – माणिक वर्मा, प्रसिद्ध मराठी गायिका.

२००३ – कनान बनाना, झिम्बाब्वेचा राष्ट्राध्यक्ष.

प्रतिवार्षिक पालन

अतातुर्क स्मृती दिन – तुर्कस्तान.

## लातूर जिल्ह्यात मतदान, मतमोजणीदिवशी मद्यविक्री राहणार बंद

लातूर : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. तसेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया खुल्या, भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण लातूर जिल्ह्यात मतदान कालावधी संपण्याच्या ४८ तास अगोदरपासून ते मतदान संपेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी संपेपर्यंत जिल्ह्यातील सर्व अबकारी अनुज्ञप्ती अंतर्गत मद्यविक्री पूर्णत: बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी दिले आहेत. निवडणूक कालावधीत मतदान संपण्याच्या वेळेपूर्वी ४८ तासापासून म्हणजेच १८ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या सायंकाळी ६ वाजेपासून, मतदानापूर्वीचा एक दिवस म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण दिवस आणि २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहील. तसेच मतमोजणी निमित्त २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करुन बंद कालावधीत मद्य विक्री करीत असल्याचे आढळून येणाऱ्या संबंधित परवानाधारकांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात येतील, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

# काँग्रेस व मित्रपक्षांच्या तोंडी पाकिस्तानची, विभाजनवाद्यांची भाषा!

## अकोला येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आघाडीवर हल्ला

मुंबई : जम्मू काश्मीरमध्ये काँग्रेस आघाडीला सत्ता मिळताच तेथे कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रस्ताव विधानसभेत मांडण्यात आला. पाकिस्तान, विभाजनवादी शक्ती, अतिरेकी प्रवृत्ती आणि भारतविरोधी शक्ती ३७० रद्द करण्याची मागणी करतात, त्याचाच पाठपुरावा काँग्रेस व त्यांचे मित्रपक्ष करू लागले आहेत,असा आरोप करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर देशविरोधी शक्तींच्या मागणीचा समर्थनाचा आरोप केला. भारतविरोधी शक्तींचीच भाषा काँग्रेस बोलत असून काश्मीरमध्ये ३७० पुन्हा लागू करून बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानास पुन्हा तेथून हद्दपार करण्याचा हा डाव आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.



अकोला येथे महायुतीच्या उमेदवारांसाठी झालेल्या विशाल जाहीर प्रचार सभेत बोलताना मोदी यांनी महाराष्ट्रातील महायुती सरकारने केलेल्या प्रगतीचा व्यापक आढावा घेत महाविकास आघाडीला सत्तेपासून दूर ठेवण्याचे आवाहन केले.यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा.प्रफुल्ल पटेल,शिवसेनेचे आनंदराव अडसूळ व महायुतीचे उमेदवार उपस्थित होते. जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा विभाजनवादी ३७० कलम लागू करण्याच्या काँग्रेसी मानसिकतेला महाराष्ट्रात थारा देऊ नका, असे ते म्हणाले. एका देशात दोन संविधान चालणार नाही ही आमची भूमिका असून कलम ३७० ची भिंत घालून काँग्रेसवाल्यांनी काश्मीरमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानास प्रवेश मिळू दिला नव्हता. ३७० कलम रद्द करून आम्ही जम्मू काश्मीरला भारतासोबत पुन्हा जोडले, आता बाबासाहेबांचे संविधान तेथे लागू झाले असून तेथील गरीब, दलितांना आरक्षणाचा मार्ग खुला झाला आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्राने भाजपाला भरभरून आशीर्वाद दिला आहे. या राज्यातील लोकांची देशभक्ती, राजनीतीची समज आणि दूरदृष्टी हे त्याचे कारण आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की केंद्रातील आमच्या सरकाने केवळ पाच महिन्यांतच लाखो करोडोंचे नवे प्रकल्प सुरू केले आहेत, त्यापैकी अनेक प्रकल्प महाराष्ट्राशी जोडले गेलेले आहेत. एकट्या वाढवण बंदराचा सुमारे ८० हजार कोटींचा प्रकल्प देशातील सर्वात मोठा बंदर प्रकल्प असेल. आमच्या सरकारने सत्तेच्या गेल्या दोन कार्यकाळात चार कोटी गरीबांना पक्की घरे दिली. प्रत्येक गरीबास घर मिळावे यासाठी आणखी तीन कोटी नवी घरे बांधण्याची सुरुवात केली असून महाराष्ट्रातील लाखो गरीबांचे पक्क्या घरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. हे पवित्र काम केल्याचे पुण्य आम्हाला निवडून देणाऱ्या जनतेला मिळेल, आणि घर मिळणाऱ्या लोकांचा आशीर्वाद आम्हाला मिळेल, असा विश्र्वासही मोदी यांनी व्यक्त केला. अजूनही कोणती कुटुंबे कच्च्या घरांत, झोपड्यांत राहात असल्याचे निदर्शनास आले, तर त्याची माहिती कळवा, माझ्या वतीने त्यांना पक्क्या घराचे आश्र्वासन द्या, ते मी पूर्ण करेन,अशी ग्वाही त्यांनी दिली.

देशातील ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य सेवा देण्याची ग्वाही मी निवडणुकीआधी दिली होती, ती आमच्या सरकारने पूर्ण केली आहे. देशातील प्रत्येक वर्ग, समाज आणि धर्माच्या प्रत्येक ज्येष्ठास या योजनेचा लाभ मिळेल, देशातील ज्येष्ठांची काळजी आम्ही घेऊ, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. काँग्रेस आणि त्यांच्या मित्रांनी राज्यातील लोकांची वर्षानुवर्षांची मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणी दुर्लक्षित केली. ही मागणी पूर्ण करण्याचे भाग्य आम्हाला लाभले, असे ते म्हणाले. केंद्रात ज्या गतीने आमचे सरकार काम करत आहे, त्याच गतीने काम करणारे महायुती सरकार मला महाराष्ट्रात हवे आहे, असे ही ते म्हणाले.

भाजपा-महायुती आहे, तर गती आहे, महाराष्ट्राची प्रगती आहे, या विश्र्वासाचा पुनरुच्चार करतानाच, महायुतीच्या वचननाम्याचा हवाला देत मोदी यांनी महिलांची सुरक्षा, महिलांकरिता नव्या संधी आणि महिलांचा विश्र्वास वाढविणाऱ्या योजनांची यादीच जनतेसमोर मांडली.माझी लाडकी बहीण योजना, युवकांसाठी लाखो रोजगार, विकासाचे मोठे प्रकल्प आदी अनेक योजनांतून युती सरकार महाराष्ट्राच्या विकासाचा वेग दुप्पट करत असून महायुतीचे सरकारच राज्याच्या विकासाचे स्वप्न साकार करणार आहे, असा विश्र्वासही श्री.मोदी यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून देशाच्या प्रगतीचा हिस्सा म्हणून त्याने अभिमानाने सहभागी व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील असून यामुळेच आम्ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही वर्षाकाठी १२ हजार रुपये देत आहोत, कापूस उत्पादकांना अतिरिक्त मदत दिली जात आहे, पीकविम्याची योजना आणली आहे, असे त्यांनी सांगितले.

नेहरूंपासून आजपर्यंत काँग्रेसच्या परिवाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सातत्याने द्वेष,अनादरच केला,देशातील अनेक योजनांचे श्रेयदेखील बाबासाहेबांना न देता काँग्रेसच्या सर्वात बड्या परिवाराने लाटले, आणि देशाच्या या महानायकाचे राजकारण संपविले, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला.केंद्रातील भाजपाच्या पाठिंब्यावर सरकार बनले तेव्हाच बाबासाहेब आंबेडकारांना भारतरत्न किताब दिला, व नेहमीच बाबासाहेबांच्या देशाच्या उभारणीतील कार्याचा सन्मान केला. बाबासाहेबांच्या वास्तव्याने पावन झालेली पंचतीर्थे भावी पिढ्यांचे प्रेरणास्थान आहेत, पण गेल्या पंचाहत्तर वर्षांत एकदा तरी काँग्रेसच्या शाही परिवारातील कोणी या पंचतीर्थांचे दर्शन घेतले असेल, तर देशाला दाखवून द्या, असे आव्हान मोदी यांनी काँग्रेसला दिले. काँग्रेसने आजपर्यंत कधीही बाबासाहेबांच्या दिल्लीतील स्मृतिस्थळास भेट दिलेली नाही, काँग्रेसच्या एका तरी नेत्याने तेथे भेट देऊन बाबासाहेबांना वंदन केले का, असा सवाल करून, संविधानाविषयीचे काँग्रेसचे प्रेम बेगडी व फसवे आहे. आता तर संविधानाच्या नावाने कोऱ्या कागदाची पुस्तके फडकावून काँग्रेसवाले देशाची दिशाभूल करत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

आता डिजिटल चलनाचा जमाना आला आहे, आणि आम्ही या चलनाच्या व्यवहारासाठी भीम युपीआय विकसित करून बाबासाहेबांचा सन्मान केला, असे ते म्हणाले.भविष्यात जेव्हा शंभर टक्के डिजिटल चलनांद्वारे व्यवहार सुरू होतील, तेव्हा देशातील प्रत्येकजण दररोज बाबासाहेबांचे स्मरण करेल, असे काम आम्ही केले आहे, असे ते म्हणाले.

**शाही परिवाराचे 'एटीएम'!**

महाआघाडी म्हणजे भ्रष्टाचार, घोटाळे, पैशाची उधळपट्टी, महाआघाडी म्हणजे टोकन मनी, बदल्यांचा धंदा, अशी अनेक विशेषणे लावून पंतप्रधानांनी महाआघाडीच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले.जेथे काँग्रेस मित्रपक्षांची सरकारे बनतात, ते सारे काँग्रेसच्या शाही परिवाराचे एटीएम म्हणून काम करू लागतात, असेही ते म्हणाले. अलीकडे हिमाचल,तेलंगणा व कर्नाटकासारखी राज्ये या परिवाराचे एटीएम बनले असून महाराष्ट्रातील निवडणुकांच्या नावावर कर्नाटकात, तेलंगणात वसुली दुप्पट झाल्याची चर्चा लोकांमध्ये सुरू आहे. कर्नाटकात दारूच्या नावाने सातशे कोटींची वसुली केल्याचा आरोप असून महाराष्ट्रात ही आघाडी सत्तेवर आली तर काय धुमाकूळ घालेल याची कल्पना करा, असा सल्लाही पंतप्रधानांनी दिला. महाआघाडीच्या महाघोटाळेबाजपणाला महाराष्ट्रात थारा देऊ नका, असे आवाहनही त्यांनी केले.

**मजबूत काँग्रेस म्हणजे मजबूर देश !**

देश कमजोर झाला तर काँग्रेस मजबूत होईल, आणि काँग्रेस मजबूत झाली तर देश मजबूर होईल, म्हणूनच जातीजातींमध्ये संघर्ष माजविण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असा आरोपही त्यांनी केला. यामुळेच काँग्रेसने गेल्या ७५ वर्षांत देशातील आदिवासी, अनुसूचित जातीजमातींना संघटित होऊ दिले नाही. असे झाले तरच सत्ता मिळविणे सोपे होईल, असा काँग्रेसचा कांगावा आहे. संघटित रहाल तर सुरक्षित रहाल व काँग्रेसला त्यांचा धोकादायक डाव साधता येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. हरियाणाच्या जनतेने हा धोका ओळखून काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवले, याचा दाखलाही त्यांनी दिला.

# लातूरच्या मुलभूत प्रश्नांवर लढली जात आहे निवडणूक

एकीकडे विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच जिल्हा रूग्णालयासह नागरीकांच्या मूलभूत अधिकारासाठी रान पेटविणाऱ्या माझं लातूर परिवाराची चुप्पी मात्र फारच बोलकी ठरत आहे. शांत, स्वच्छ, सशक्त, सुसंस्कृत लातूरसाठी सातत्याने आग्रही असणाऱ्या लातूरच्या या अराजकीय समूहाने निवडणूक काळात पाळलेले मौन सर्वच उमेदवारांना मुलभूत प्रश्र्नांवर बोलण्यास भाग पाडत आहे यातच या परिवाराचे महत्व अधोरेखित होते.गेल्या दहा वर्षांपासून लातूरच्या सामाजिक क्षेत्रात प्रभावी आणि निर्णायक भूमिका घेत अनेक सामाजिक प्रश्र्नांची उकल करण्यात यशस्वी ठरलेला माझं लातूर परिवार हा अराजकीय समूह दिशादर्शक ठरला आहे. पत्रकार, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधिष्ठाता, सर्व विभागातील प्रशासकीय अधिकारी, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, वकील, व्यापारी, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक अशा समाजातील सर्वच क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांचा सक्रीय सहभाग असणारा परिवार. एक कुटूंब म्हणून प्रत्येक सदस्य आपापली जबाबदारी, कर्तव्य बजावत असतात. माझं लातूर परिवारात चर्चिले जाणारे अनेक सामाजिक विषय प्रशासनाच्या मदतीने मार्गी लागतात. आजपर्यंत हजारो गरजू रुग्णांना दिलासा देण्याचे कार्य परिवाराच्या माध्यमातून झाले आहे. कोरोनाकाळात प्रत्यक्ष रुग्णांना केलेली मदत, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, वाहतुकीचे नियम पाळावेत यासाठी महाविद्यालयीन युवक युवतीसाठी जनजागृती उपक्रम, संविधान उद्देशिकांचे मोफत वितरण, रक्तदान, वृक्ष लागवड चळवळीला गतिमान करण्यासाठी विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करीत माझं लातूर परिवाराने निस्वार्थ सेवाभावाचे आदर्श उदाहरण ठेवले आहे. लातूर जिल्ह्याच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जिल्हा रुग्णालयाचा विषय मार्गी लावण्यासाठी माझं लातूर परिवाराने दिलेला लढा राज्यभरात चर्चेचा विषय ठरला. यासाठी केलेले ऐतिहासिक साखळी उपोषण, चक्क मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, आरोग्यसचिव, पालकमंत्री यांना साकडे घातले. जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींना ३-३ वेळा प्रत्यक्ष भेटून पुढाकार घ्यावा अशी विनंती केली. या लढ्याला यश देखील आले. राज्यशासनाने १९ जून २०२४ रोजी अध्यादेश काढून जागा हस्तांतरण करण्यास मान्यता दिली आणि ही संपूर्ण प्रक्रिया ६० दिवसात पुर्ण करावी असे आदेश दिले. मात्र लातूर जिल्हयाचे दुर्दैव म्हणावे लागेल केवळ आणि केवळ ३ कोटी ३२ लक्ष ६८ हजार ६५० रुपये निधी उपलब्ध होऊ न शकल्याने आजही हा विषय लालफितीत अडकून आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि आचारसंहितेच्या नावाखाली या महत्त्वपूर्ण विषयाला बगल देण्यात राजकारणी यशस्वी ठरले. या संपुर्ण आंदोलनात माझं लातूर परिवाराने कधीही राजकारण येऊ दिले नाही. सत्ताधारी आणि विरोधक यांना या प्रश्र्नावर बोलण्यास अक्षरशः भाग पाडले आहे. निवडणूक प्रचारात प्रत्येक उमेदवार जिल्हा रूग्णालय हा विषय सर्वप्रथम सोडवू असे आश्र्वासन देत आहेत. यातच माझं लातूर परिवाराच्या आंदोलनाचे यश आहे. तर्क हे अनेकदा व्यक्ती सापेक्ष किंवा प्रसंग सापेक्ष असतात. या तर्कातून निघालेला सार योग्यच असेल असे नाही. ही समयसूचकता, सामाजिक भान माझं लातूर परिवाराच्या प्रत्येक मान्यवर सदस्यांच्या वर्तनातून स्पष्ट होत आहे. संयम, सहनशीलता आणि संस्काराच्या शिदोरीवर लढलेला हा लढा माझं लातूर परिवाराला जिल्हा रूग्णालय हा मुलभूत अधिकार मिळवून देईल यात कसलीही शंका नाही. निदान यापुढील काळात तरी निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींनी सर्वसामान्य जनतेच्या मूलभुत प्रश्र्नांवर जागरूक राहावे अशी अपेक्षा.

**सतीश तांदळे,माझं लातूर परिवार**

# विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीला आशीर्वाद द्या,भाजपा नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचे आवाहन

मुंबई : गेल्या अडीच वर्षात केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारमुळे महाराष्ट्राने विकासाची नवी उंची गाठली आहे. समाजातील सर्व घटकांचा विकास आणि महिला सन्मान हे भारतीय जनता पार्टीचे ध्येय आहे. त्यानुसारच विकासाची कामे गतीने होत आहेत. विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीला आशीर्वाद द्या असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी शनिवारी केले.भाजपा मीडिया सेंटरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत श्रीमती इराणी बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ला,डॉ.सय्यद जफर इस्लाम,प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान,देवांग दवे आदी उपस्थित होते.एकीकडे विकासाला गती देणारी महायुती तर दुसरीकडे 'मतासांठी झूठ, सत्तेत आल्यावर लूट आणि देशातील जनतेत फूट' अशी नीती असणारी महाविकास आघाडीआहे अशी सडकून टीकाही श्रीमती इराणी यांनी केली.



श्रीमती. इराणी म्हणाल्या की,विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात अन्य राज्यातील काँग्रेसचे नेते आता महाराष्ट्रात खोटारडेपणाचे मायाजाल पसरवायला आले आहेत.कर्नाटकात आताची दिवाळखोरीची स्थिती पाहता निवडणूक काळात काँग्रेसने दिलेल्या खोट्या आश्र्वासनांमुळे राज्याची तिजोरी खाली झाली हेच सिद्ध झाले आहे.कर्नाटकला दिवाळखोरीच्या मार्गावर आणणाऱ्या काँग्रेस पक्षाने आदिवासी आणि दलित समाजाच्या प्रगतीसाठी राज्याच्या तिजोरीतील सुमारे दहा हजार कोटींचा निधी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी इतरत्र वळवला आहे. राजस्थानात जनतेला भुरळ घालून मते मिळवण्यासाठी काँग्रेसने बेरोजगारांना भत्ता देण्याचे जाहीर केले. पण तिथे ना बेरोजगारांना रोजगार मिळाला ना भत्ता. त्यामुळे मागील विधानसभा निवडणुकीत तरुणांचा जोश आणि जनतेचा रोष पहायला मिळाला आणि भाजपाला पुन्हा जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली.

जे नेते हरियाणाच्या निवडणुकीत जिलेबीची फॅक्टरी उघडण्यासाठी इच्छुक होते त्यांना हरियाणाच्या जनतेने चोख उत्तर दिले आहे. पण जे महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी आले त्यांनी हिमाचलच्या जनतेला वीज बिल कमी करण्याचे आश्र्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र तिथे बिले वाढवली. प्रत्येक महिलेला दरमहा १५०० रुपये देण्याचेही आश्र्वासनही त्यांनी दिले होते. पण प्रत्यक्षात ९६ टक्के महिलांना त्यापासून त्यांनी वंचित ठेवले. मते मिळवण्यासाठी काँग्रेस निवडणुकीच्या काळात खोटे बोलते, नंतर लूट करते आणि देशात फूट पाडते हे कळून चुकल्याने महाराष्ट्रतील जनता या खोट्या आश्र्वासनांना बळी पडणार नाही.

मोदी सरकारने सर्वांसाठी जनकल्याणाच्या योजना राबवल्या,सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकास साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. जातीजातींमध्ये फूट पाडणा-या आणि केवळ मत हवे,विकास नको अशी नीती असणा-या विरोधकांना मतदार त्यांची जागा दाखवतील असेही त्या म्हणाल्या.

# महायुती च्या सरकारमध्ये विकासाचा अधिकचा वाटा घेण्यासाठी आ. अभिमन्यू पवार यांचे हात बळकट करा - शरण पाटील..

औसा - आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचार सभेला असलेली लोकांची गर्दी सांगत आहे कि जनतेचा आशिर्वाद त्यांच्या पाठीशी आहे. त्यांनी केलेल्या विकास कामातून आज औशाची चर्चा राज्यात असून विकासाच हहा रथ पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून देण्याचे काम जनतेने करायचे आहे असे सांगून राज्यात पुन्हा महायुती चे सरकार येणार आहे. त्यामध्ये विकासाचा अधिकचा वाटा घेण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांचे हात बळकट करावे असे आवाहन शरण बसवराज पाटील यांनी केले आहे.



आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी तांबाळा येथे आयोजित सभेत ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार अभिमन्यू पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दिपकराव, विनोद आर्य, धम्मानंद कांबळे, उध्दव मेकाले, दाऊद पटेल, शिवचरण पाटील, बसवराज पाटील, शरणाप्पा मुळे, संजय सोनकांबळे, शिवलिंग स्वामी, आलू महाराज स्वामी, शिवलिंग स्वामी, सुनील माने, ओम बिराजदार, ज्ञानेश्र्वर वाकडे, नितीन पाटील, मल्लिकार्जुन दानाई, कल्पना ढविले, संगीता कदम आदीसह ग्रामस्थ मोठय़ा संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले की आमदार अभिमन्यू पवार यांनी या पाच वर्षांत विकासाचे अनेक कामे पूर्ण करीत या विकासाने मागासलेल्या भागाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. एका एका गावात चार ते पाच कोटींचा निधी देऊन त्या भागातील मुलभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना कुठेही जात, पात, धर्म हा भेदभाव केला नाही. विकासाचा समांतर वाटा देणार्या या नेतृत्वाचे हात आपण मजबूत केले पाहिजेत मराठवाड्यात सर्वाधिक मताधिक्याने हि जागा निवडून आणायची जबाबदारी आता आपली असून राज्याच्या मंत्रिमंडळात आमदार अभिमन्यू पवार यांना स्थान मिळणार असून त्यामुळे याभागातील विकासाला आणखी गती मिळणार आहे. महाविकास आघाडीच्या भूलथापांना बळी पडू नका महायुतीच्या सरकारने सर्व सामान्यांच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या पोटात गोळा उठला असून या योजना बंद व्हावा म्हणून त्यांचा आमदार सुनील केदार यांनी न्यायालयात धाव घेतली होती.याचा जाब तुम्ही मत मागायला येणाऱ्या ठाकरेंच्या उमेदवारांना विचारला पाहिजे. सर्व सामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करणारे महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास या कल्याणकारी योजनेला आणखी बळ मिळेल लाकडी बहिण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रक्कमेत वाढ होवून महिलांना प्रत्येक महिन्याला २१०० रूपये देण्याचे आश्र्वासन या सरकारने दिले असून महिलांच्या सन्मान वाढविण्यासाठी अनेक चांगले निर्णय आमच्या सरकारने घेतले असल्याचे यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी सांगितले.

# निवडणूक खर्च तपासणीसाठी अनुपस्थित उदगीर, निलंगा मतदारसंघातील उमेदवारांना नोटीस

लातूर : निवडणूक खर्च निरीक्षक डॉ. रामसिंह गुर्जर यांच्या उपस्थितीत झालेल्या निवडणूक खर्चाच्या पहिल्या तपासणीला अनुपस्थित उदगीर, निलंगा मतदारसंघातील उमेदवारांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नोटीस बजाविल्या आहेत. उदगीर विधानसभा मतदारसंघातील ५ आणि निलंगा मतदारसंघातील ८ उमेदवारांनी ही नोटीस बजावण्यात आली आहे.



निवडणूक खर्च निरीक्षक डॉ. गुर्जर यांच्या उपस्थितीत उदगीर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची पहिली तपासणी ७ नोव्हेंबर रोजी उदगीर येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी मतदारसंघातील १३ उमेदवारांपैकी ८ उमेदवारांनी निवडणूक खर्च लेखे तपासणीसाठी सादर केले. यावेळी ५ उमेदवार गैरहजर होते.

तसेच निलंगा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी ८ नोव्हेंबर रोजी निलंगा येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात झाली. यावेळी १३ पैकी ५ उमेदवार उपस्थित राहिले. तसेच ८ उमेदवार गैरहजर होते. सर्व गैरहजर उमेदवारांना लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७(१) नुसार संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नोटीस बजावून ४८ तासाच्या आत लेखी उत्तर देण्याबाबत कळविले आहे.

# स्वार्थासाठी निवडणूक रिंगणात उतरणाऱ्या ठाकरेंच्या उमेदवारांना धडा शिकवा - शिवाजीराव माने

औसा - पराभूत झाल्यानंतर तब्बल पंधरा वर्ष बेपत्ता असलेले विरोधी उमेदवार आता उमेदवारी घेऊन या भागात मत मागायला येत आहेत पंधरा वर्ष जनतेच्या सुख दु:खात कधीही सहभागी झाले नाहीत. केवळ स्वार्थासाठी निवडणूक रिंगणात उतरायचे आपला स्वार्थ साधायचा एवढेच उद्योग केलेल्या या विरोधी उमेदवारांना ६८ गावातील जनतेने धडा शिकविला पाहिजे असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केले असून आपल्या मतदारसंघातील उज्ज्वल भवितव्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणून आपल्या मतदारसंघासाठी लाल दिवा पदरात पाडून घेण्याची संधी आपल्याला मिळाली असून आपण या संधीचे सोने करून घ्यायचे असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे. महायुती चे अधिकृत उमेदवार आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ (दि.८) रोजी तांबाळा येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की आमदार अभिमन्यू पवार यांनी या पाच वर्षांत विकासाचे अनेक कामे पूर्ण करीत या विकासाने मागासलेल्या भागाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

**लक्ष्मी प्रसन्न ..**

निवडणूक काळात
मुक्तपणे फिरे पैसा
आधी चंचल लक्ष्मी
पैसा शोधतो खिसा
विकतघेतो काहीही
पैशांचा नसे भरोसा
हक्क दावे सर्वांवरी
एकाचा नसे सहसा
काहीही करून दावे
दाद दे तया साहसा
कधी हिंडे उघडपणे
कधी शोधी आडोसा
विक्रीस काढेमाणूस
कायम्हणावे धाडसा
बरबाद करे एखाद्या
बिघडू टाके माणसा
रात्री लपू छपून फिरे
उजळमाथ्यानेदिवसा
पैशात ताकद भलती
पोचवी कुणा कळसा
पाताळाधाडी कुणास
वेगळा असे अंमळसा
दोष देण्याआधी दुजा
पहावा स्वताचआरसा
२

**सांभाळ ..**

घेतो आता निवृत्ती
मुला माझे सांभाळ
भावनीक आवाहने
भोळीजनता बंबाळ
खुर्चीत नेहमी बसवे
करु नका रे आबाळ
चालवी शासन मस्त
नसूदे अनुभवी बाळ
निष्ठावंत भक्तमंडळी
सुरांतवाजवती टाळ
मुला नंतर सुनेच्याही
गळ्यां सत्तेची माळ
स्त्रीदाक्षिण्य दाखवे
कुंकवे शोभे कपाळ
नका म्हणू हिणवू रे
काय कळते कपाळ
नंतर तयार नातवंडे
भले मोठालेआभाळ
परिवारा संगीतखुर्ची
चालू ठेवावे गु–हाळ
कैकदशके रे सत्तेची
कुटूंबा जोडली नाळ
सत्ता हाव जरी नाही
आम्हांवर उगां आळ

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## भाजपचे नेते, माजी नगरसेवक भारत साबदे, भाजप पदाधिकारी गौस शेख, अॅड. गणेश कांबळे, अविराजे निंबाळकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये केला जाहीर प्रवेश

लातूर : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील गंजगोलाई येथील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे पुतळ्या नजीक महाविकास आघाडीची प्रचार सभा संपन्न झाली. या सभेत भाजपचे नेते माजी नगरसेवक भारत साबदे, भाजप पदाधिकारी गौस शेख, अॅड. गणेश कांबळे, अविराजे निंबाळकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून नेत्यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मतदार आणि उमेदवारांकरिता विविध ऑप्लिकेशन्स...

'सी –व्हिजिल अॅप' आता मराठीमध्ये देखील उपलब्ध

भारत निवडणूक आयोगाने मतदार आणि उम ेदवारांकरिता सी–व्हिजिल, सुविधा अॅप, अॅफिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट अॅप, व्होटर हेल्पलाइन अॅप, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांकरिता सक्षम अॅप, केवायसी अॅप आणि १९५० क्रमांकाची हेल्पलाईन आदी आयटी अॅप्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...

सी–व्हिजिल

सी–व्हिजिल हे अॅप हे आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल अॅप्लिकेशन आहे. ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा दृक चित्रण अपलोड करता येते. 'सी–व्हिजिल' चा अर्थ 'सतर्क नागरिक' असा आहे. हे अॅप आता मराठी भाषेत पण उपलब्ध आहे.या अॅपच्या म ाध्यमातून तक्रार दाखल झाल्यानंतर आचारसंहिता उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जी.पी. एस.चा उपयोग करता येतो.तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेवून १०० मिनिटांत स्थितीची माहिती देते.

सी–व्हिजिल अॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक. गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id-in.nic.eci.cvigil&hl-en_IN अॅपल स्टोअर https://apps.apple.com/in/app/cvigil/id१४५५७१९५४१ वर उपलब्ध आहे.

सुविधा अॅप २.०

भारत निवडणूक आयोगाने (एउख) 'सुविधा २.०' हे मोबाईल अॅप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहे. सुविधा २.० हे मोबाईल अॅप वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे. या अॅपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदर्भातील परवानग्या म ागवणे, अर्ज केलेल्या परवानगी संदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहे. त्याचबरोबर या अॅपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.

गुगल प्ले स्टोअरवर https://play.google.com/store/apps/details?id-suvidha.eci.gov.in.candidateapp&pli–१ यावर आणि आयओएससाठी अॅपल अॅप स्टोरवर https://apps.apple.com/app/suvidha-candidate/id६४४९५८८४८७ या लिंकवर उपलब्ध आहे.

अॅफिडेविट पोर्टल

'अॅफिडेविट पोर्टल' निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी पाहता येते. कोणताही नागरिक 'अॅफिडेविट पोर्टल'चा उपयोग करून उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहू शकतो व डाउनलोड ही करू शकतो. नागरिकांच्या सुविधेसाठी नामांकन दाखल, स्वीकारले, नाकारले, मागे घेतले, उमेदवार स्पर्धेत आहे याची माहिती मिळते.

पोर्टलची लिंक : https://affidavit.eci.gov.in

व्होटर टर्नआऊट अॅपङ

व्होटर टर्नआऊट अॅप प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजित मतदानाच्या टक्केवारीची दर दोन तासांनी माहिती देते. हे अॅप्लिकेशन फक्त विधानसभा, लोकसभा आणि पोटनिवडणुकीच्या वेळी सक्रिय होते.

'व्होटर टर्नआऊट' अॅपमध्ये प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची अंदाजित मतदान टक्केवारी दाखवते.भारत निवडणूक आयोगाच्या सर्व्हर वरून 'रिअल–टाइम' डेटाचा उपयोग करण्यात येतो.निवडणूक प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार यामध्ये मतदानाच्या टक्केवारीची माहिती मिळते.एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मतदानाचा अंदाज मिळवण्याचा हा एक जलद आणि सोपा असा पर्याय आहे

'व्होटर ट्र्नआऊट अॅप डाउनलोड करण्यासाठी गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id-in.gov.eci.pollturnout&hl-en_IN

A°nb ñQ>moAa https://apps.apple.com/in/app/voter-turnout-app/iव१५३६३६६८८२

व्होटर हेल्पलाइन अॅप

मतदारांना आपले मतदार यादीत नाव आहे याची माहिती व्होटर हेल्पलाईन अॅप मध्ये मिळते. हे अॅप प्रत्येकासाठी अधिक सोयीस्कर आणि महत्त्वाचे आहेत. व्होटर हेल्पलाईन अॅपमध्ये मतदारयादीत नावाची शहानिशा करणे,नवीन मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे, दुसऱ्या मतदारसंघात स्थलांतरित करणे,परदेशात राहणारे मतदार, म तदारयादीतील नाव हटवणे किंवा आक्षेप घेणे,नोंदींची दुरुस्त करणे,तुमच्या क्षेत्रातील निवडणुकीचे वेळापत्रक शोधणे, सर्व उमेदवार त्यांचे प्रोफाइल, उत्पन्न विवरण, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे शोधणे, बीएलओ, ईआरओ, डीईओ आणि सीईओ यांची माहिती मिळवता येते व संपर्क साधता येतो

व्होटर हेल्पलाइन अॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक :गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id-com.eci.citizen&hl-mr&pli–१

अॅपल स्टोअर https://apps.apple.com/in/app/voter-helpline/id१४५६५३५००४

सक्षम अॅप

भारतीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता हे अॅप विकसित केले आहे. या अॅपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रम ांक इ. माहिती अॅपमध्ये भरावी. दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम अॅपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे मतदारसंघातील दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे म तदारसंघ व स्थान निश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. या अॅपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग म तदारांना मतदान केंद्रापर्यंत ने–आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या अॅपच्या माध्यमातून मिळणार आहेत.

सक्षम अॅपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत. या अॅपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल अॅपवर तक्रार नोंदविता येणार आहे.

गुगल प्ले स्टोअर मध्ये https://play.google.com/store/apps/details?id-pwd.eci.com.pwdapp

अॅपल फोन धारकांसाठी https://apps.apple.com/in/app/saksham-eci/id१४९७८६४५६८

केवायसी अॅप :– (know your Candidate)*

मतदारांना त्यांच्या उमेदवारांबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेल्या गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती इत्यादी पाहता येऊ शकते.

गुगल प्ले स्टोअर मध्ये https://play.google.com/store/apps/details?id-com.eci.ksa

अॅपल फोन धारकांसाठी https://apps.apple.com/in/app/kyc-eci/id१६०४१७२८३६

१९५० क्रमांकाची हेल्पलाइन

निवडणूक विषयी मतदारांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर १९५० या टोलफ्री क्रमांकाची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे.राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर संपर्क केंद्र स्थापन करण्यात आले आहेत.

**- संध्या गरवारे, विभागीय संपर्क अधिकारी**

# फ्रीजरमध्ये का तयार होतो बर्फाचा डोंगर? ४ प्रकारे दुरुस्त करा, आणि तुमच्या फ्रीजचे आयुष्य वाढवा

हिवाळा संपत आला आहे, आता थंडीचे १५ ते २० दिवस उरले आहेत. यानंतर उन्हाळा आणि नंतर पावसाळा येईल. या ऋतूमध्ये घरात सध्या रेफ्रिजरेटरचा सर्वाधिक वापर केला जातो. ज्यामध्ये तहान शमवण्यासाठी पाणी थंड केले जाते आणि अन्न आणि भाज्या ताज्या ठेवल्या जातात.

परंतु काही लोक त्यांच्या रेफ्रिजरेटरच्या फ्रीजरमध्ये साचलेल्या बर्फाच्या पर्वतांमुळे त्रासलेले असतात. ज्या फ्रीजचा कमी वापर केला जातो त्या फ्रीजमध्ये बऱ्याचदा बर्फाचे डोंगर साचतात. जर तुम्हालाही अशीच समस्या भेडसावत असेल, तर आम्ही तुम्हाला रेफ्रिजरेटरमधील थंडीच्या डोंगरापासून कशी सुटका मिळवू शकता ते सांगणार आहोत.

वारंवार उघडू नका फ्रीज

जर तुमच्या फ्रीजरमध्ये आवश्यकतेपेक्षा



जास्त बर्फ साठवला जात असेल, तर कदाचित त्यात जास्त आर्द्रता आहे. फ्रीजमध्ये ओलावा जाण्यापासून रोखण्यासाठी दिवसा किमान फ्रीज उघडा. वास्तविक, जेव्हा तुम्ही फ्रीज उघडता, तेव्हा आतमध्ये गरम हवा जाते, जी आतल्या थंड हवेशी संयोग होऊन ओलावा निर्माण करते आणि नंतर तिचे बर्फात रूपांतर होते.

फ्रीजर योग्य तापमानावर सेट करा

जर तुमच्या फ्रीजरमध्ये खूप बर्फ जमा होत असेल तर त्याचे तापमान –१८ डिग्री फॅरेनहाइट सेट करा. तुमचे फ्रीझर या तापमानापेक्षा वर सेट केले असल्यास, ते खाली करा. अन्यथा, फ्रीजमध्ये अधिक बर्फ जमा होण्यास सुरवात होईल.

फ्रीजरमध्ये जास्त सामान ठेवा

फ्रीझरमध्ये बर्फ तयार होण्यापासून रोखण्यासाठी, ते अधिक वस्तूंनी भरलेले ठेवा. वास्तविक, फ्रीजरमध्ये जितकी जास्त जागा असेल तितकी जास्त आर्द्रता त्यात निर्माण होते, जी कालांतराने थंड किंवा बर्फात बदलते.

डीफ्रॉस्ट ड्रेन स्वच्छ करा

बहुतेक रेफ्रिजरेटर्सच्या पृष्ठभागावर एक ट्यूब असते, जी पाणी काढून टाकते. अशा परिस्थितीत जर हा पाईप जाम झाला, तर तुमच्या रेफ्रिजरेटरमध्ये बर्फ जमा होऊ शकतो. हे टाळण्यासाठी, ते नियमितपणे स्वच्छ करणे आणि घाण काढून टाकणे आवश्यक आहे.

# मुलांनो मैदानात या------

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात.

तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही.

भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे.

या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राशीभविष्य १० नोव्हेंबर २०२४ ते १६ नोव्हेंबर २०२४

मेष : पत्रव्यवहारातून कळणारी एखादी गोड वार्ता, मुलांच्या बाबतीत सुटलेला एखादा प्रश्न नोकरी–व्यवसायात मिळणारी एखादी महत्त्वाची संधी आणि एखादाच महत्त्वाचा ग्रहक हाती आल्याने होणारा आनंद यापैकी एखादा आनंद आज आपणास ग्रहमान देण्यास सिद्ध आहेत. वादविवाद होतीलही परंतु यशाचा 'ग्राफ' वाढता राहील. कुठेही स्वत:चा हेका चालू न ठेवता समोरच्याचे शांतपणे ऐका. स्वत:ची बाजूही व्यावहारिकदृष्ट्या विचारात घ्या आणि मगच निर्णय घ्यायला लागा.

वृषभ : ऐनवेळी कोणाची झालेली मदत, अनपेक्षितपणे वाढलेली आवक किंवा मोठ्या कार्यातील दूर झालेले अडथळे यातून आनंददायी वार्ता समोर येईल. देवावरचा विश्वास वाढावा असा एखादा प्रसंग आज घडणे शक्य. कामाचा ताण वाढता राहील. मित्र–मैत्रिणींसमवेत दिवसातला काही वेळ आनंदात घालवाल. कुणाचे उणे–दुणे काढण्यापेक्षा आपली व्यावहारिक बाजू सशक्त करण्यावर आज विशेष भर द्या. आपल्याकडे असलेल्या माहितीचा योग्य उपयोग करून घेणार आहात.

मिथुन : कोणालाही फुकट सल्ला द्यायला जाऊ नका. आपले काम, आपला आर्थिक व्यवहार आणि आपले सगे सोयरे असा खरेतर काहीसा स्वार्थी विचार आज आपणापाशी असणे आवश्यक ठरावे. धर्मकार्याचा बाऊ न करता व्यावहारिकदृष्ट्या आज आपणास अनेक निर्णय घ्यायचे आहेत हे विसरू नका. कामाच्या ठिकाणी काम, घरातल्या ठिकाणी घरचे काम आणि देवधर्माच्या वेळेस फक्त देवधर्म असे वागणेच महत्त्वाचे आहे.

कर्क : आपल्यासाठी एकच महत्त्वाचा आजचा सल्ला म्हणजे हाताखालील लोकांकडून आज बरीच कामे करून घ्यायचे आहेत. ते दुखावले जाणार नाहीत याची काळजी घ्या. आर्थिकदृष्ट्या उधारी वसुली चांगली होईल. व्यापाऱ्यांना ग्रहकांचा प्रतिसाद पुरेसा मिळेल. एखादा धाडसी व्यवहार करून पैशाची तरतूद साधू शकाल. धार्मिक कृत्यातून चांगले समाधान मिळेल.

सिंह :

वडिलोपार्जित इस्टेटीचे वाद असतील तर आज तरी वाढवू नका. नोकरी–व्यवसायातले निर्णय आज झटपट घ्यावे लागतील. कोणत्याही मोठ्या खरेदीचा मोह आवरणे हिताचे. त्यातही आपण घरातील कोणाला 'सरप्राईज' देण्याच्या उद्देशातून करत असाल तर थोडे थांबा. आर्थिकदृष्ट्या वसुलीसाठी अन्य कोणाची मदत घ्यावी लागेल. भांडवली गुंतवणूक वाढविता येईल. नव्या औद्योगिक क्षेत्राची बातमी कळेल. कला क्षेत्रात एखादी संधी मिळेल. वाहनांवर मात्र ताबा ठेवा. चेक बुक इ. महत्त्वाच्या वस्तू सांभाळून ठेवा.

कन्या : घरगुती बाबतीत आपणास आनंददायी घटना कळेल. घरातील वृद्धांच्या तब्येतीकडे लक्ष द्या. मुलांचे बाहेर जाऊन भलतेच उद्योग होत नाहीत ना याची काळजी घ्या. चुकून पडलेला पाय इजा घेऊन येऊ शकतो. कोणताही निर्णय आत्मघातकी ठरू शकतो. थोडे शांतपणे व बरेचसे विचारपूर्वकच पाऊल टाकायचे आहे.

तूळ : एखादी रहस्यमय बातमी हाती येईल. स्नेहसंबंध दृढ होतील. सहज जाता–जाता एखादा आर्थिक व्यवहार संपन्न होईल. आपल्या कार्यात चांगलेच निमग्न राहता येईल. स्त्रियांना आपली हौस भागवून घेता येईल. कामाचे गणित चुकवून नका. जुने विकार बळावल्यास पुरेसे लक्ष द्या. धर्मकार्य करताना कोणतेही वेगळे बोलणे मुळातून टाळा.

वृश्चिक : आजची एखादी कृतीसुद्धा आपणास मनसोक्त यश देणारी ठरू शकते. थोरामोठ्यांबरोबर होत असलेली उठबससुद्धा आपणास फायद्याची ठरेल. घरात आनंदी वातावरण राहील. आर्थिक व्यवहारात कुठेही मागे पडू नका. कामाचा व्याप कितीही वाढला तरी नाराज होऊ नका.

धनू :सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी राहील. प्रकाशक मंडळींना चांगला लेखक हाताशी येईल. शिक्षण क्षेत्रात नाव मोठे करता येइल. किराणा दुकानदार तसेच शेतकरी इ. मंडळींना आपल्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. आजचा दिवस आपल्यासाठी एखादी संस्मरणीय घटना आणून देणारा ठरू शकतो. एखादा व्यावसायिक निर्णय आपल्या बाजूने लागेल. भेटी गाठी आणि चर्चासत्रे यांना आज विशेष महत्व द्या.

मकर : कामाच्या ठिकाणी खर्चाचा एखादा मोठा आकडा समोर येणे शक्य. वैवाहिक जीवनात एखादी आनंद वार्ता आपणास कळू शकते. जोडीदाराचा पुरविलेला हट्ट तसेच कुटुंबात कोणाकडून मिळालेली आनंदवार्ता यातून मन उल्हासित बनेल. कोणत्याही परिस्थितीत आपले हितसंबंध दुरावले जाणार नाहीत याची तेवढी काळजी घ्या. कोणालाही एकदम दुखवू नका. कोर्ट–कचेरीची कामे शक्यतो पुढे ढकला.

कुंभ : राजकारणात असलेल्या मंडळींना वेळीच सावधानतेचा इशारा मिळेल. सामाजिक कार्यातूनही अशीच एखादी धोक्याची घंटी ऐकू येणे शक्य. प्रतिस्पर्ध्यांचे नेमकं डाव लक्षात येतील. नोकरी–व्यवसायात त्याचा अचूक वापर करून घेता येईल. आज प्रवास, पत्रव्यवहार किंवा महत्त्वाच्या अशी गाठभेट यापैकी एखादी गोष्ट फलद्रूप झाल्याचे लक्षात येईल.

मीन :

आज आपल्या बोलण्यावर आपण बरेच काही कमवू शकाल. नोकरदार असो की व्यावसायिक आपणास आज चांगली संधी मिळेल. व्यापारात एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. नोकरदारांना वरिष्ठांशी चांगले सूर जमवता येतील. खर्च होणारा प्रत्येक रुपया हा महत्त्वाचा आहे. विचारपूर्वकच त्याला वाट करून द्या. कोणाच्या बोलण्यावर भुलून किंवा गोड बोलण्यात अडकून खर्च वाढणार नाही असे पहा. विशेषत: खरेदी करताना ही गोष्ट लक्षात ठेवा.

१० नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य व मंगळाचा प्रभाव आहे. तुमची बुध्दी अतिशय तल्लख आहे. कुठल्याही समस्येचे आकलन तुम्हाला तात्काळ होते. तुमचा उत्साह प्रचंड असतो. त्यामुळे इतरांनाही तुमच्यापासून स्फूर्ती मिळते. प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर रहाण्याचा तुम्ही प्रयत्न करता. कीर्ती, प्रसिध्दी, नावलौकिक तुम्हाला लवकर प्राप्त होतात. तुम्ही आदर्शवादी आहात. भ्रष्टाचाराची तुम्हाला मनापासून चीड असते. सम ाजात काही आदर्श नीतिमूल्ये प्रस्थापित करण्यासाठी तुम्ही झटत असता.

सगळ्यांपेक्षा आपल्यालाच जास्त कळते अशा भ्रमात राहू नका. तज्ज्ञांचा वेळोवेळी सल्ला घ्या. आपल्या आस्मितेची परिणती अहंकारी वृत्तीत होऊ देऊ नका. अतिश्रमांमुळे डोळे, मेंदू, उच्च रक्तदाबाचे विकार होतील. सुर्य नमस्काराचा व्यायाम उपयुक्त ठरेल.

कार्यक्षेत्र : केंद्र वा राज्यशासनाच्या सेवांमध्ये चटकन प्रवेश मिळेल. त्यासाठी लोकसेवा आयोगासारख्या स्पर्धापरीक्षांची तयारी करा. कार्यक्षमता उंचावण्याचे कौशल्य असल्याने व्यवस्थापकीय पदापासून संचालक मंडळाकडे खाजगी कंपन्यात वाटचाल करू शकाल. नियतकालिके, प्रसिध्दी विभाग यात लवकर पुढे जाल. वैद्यकीय विभागात नेत्ररोग, हृदयविकार, त्वचारोग ही क्षेत्रे अनुकूल आहेत.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894